# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.१०/१०/२०२२

**आरोपी लोकसेवक विनोद सुभाष भुरकाडे वय-४० वर्ष, पद ग्रामसेवक, पंचायत समिती कार्यालय मानोरा जि. वाशिम,यांना १०,०००/- रुपयेची लाच मागणी प्रकरणात गुन्हा नोंद बाबत .**

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | श्री.विनोद सुभाष भुरकाडे वय-४० वर्ष, पद ग्रामसेवक, पंचायत समिती कार्यालय मानोरा जि.वाशिम,रा.मुंगसाजी नगर मानोरा ता.मानोरा जि.वाशिम |
| लाच मागणी रक्कम | १०,०००/-रुपये<br>तडजोडीअंती ९०००/ रूपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदाराचे भावाचे घराचा नमुना ८ अ तयार करून देणेकरीता |
| सापळा अधिकारी | एम.एम.अफुने,पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

थोडक्यात हकिकत

तक्रारदार यांचे भावाचे गावच्या गावठाण्यात असलेल्या घराचे नमुना ८अ तयार करणे कामी तक्रारदार यांना रु. १०,०००/- लाचेची मागणी केल्याची दि. १०/१०/२०२२ रोजी तक्रार प्राप्त झाली.

दि. १०/१०/२०२२ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक यांनी तडजोडीअंती तक्रारदार यांना ९०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले . दि. १०/१०/२०२२ रोजी सापळा कारवाई चे आयोजीत केली असता सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक यांना तक्रारदार यांचा संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही. याबाबत लाच मागणी संबंधाने गुन्हा पोलीस स्टेशन मानोरा जि. वाशिम येथे नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विशाल वि. गायकवाड ला.प्र.वि.परिक्षेत्र अमरावती, अपर पोलीस अधिक्षक श्री. अरुण सावंत, अपर पोलीस अधिक्षक श्री.देविदास घेवारे ला.प्र.वि.परिक्षेत्र अमरावती, पोलीस उपअधिक्षक गजानन आर. शेळके ला.प्र.वि वाशिम, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक एम.एम.अफुने , पोलीस निरीक्षक महेश भोसले व अंमलदार पोहेकॉ दुर्गादास जाधव ,पोहवा राहुल व्यवहारे, पोना योगेश खोटे, पोना रवि घरत चापोशी नावेद शेख ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन एम.एम.अफुने, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं. - १०६४
एम.एम अफुने - ८३९०७६१५०३.
एम.के.भोसले - ९०२८२००४४४

कार्यालय पोलीस उपअधिक्षक अँटी करप्शन ब्युरो * वाशिम *

(एम.एम.अफुने)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.